RNI No. MAHBIL/2009/35526

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार-क

वर्ष ५, अंक २९] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १२-१८, २०१९/भाद्र २१-२७, शके १९४१ [पृष्ठे २

[किंमत : रुपये ६.००]

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५वा मजला, १४, जमशेटजी टाटा रोड,
चर्चगेट, मुंबई ४०० ०२०, दिनांक ३ सप्टेंबर २०१९

वाचा.—(१) क्र. निशि/केरो/२०१९/का.वि. ४८०/सहा/जा. ३३६, दिनांक २१ ऑगस्ट २०१९.

(२) शासन पत्र क्रमांक रॉकेल-२०१८/प्र.क्र. १/ना.पु. २७, दिनांक १४ मे २०१८.

(३) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांचा दिनांक ३ सप्टेंबर २०१९ रोजी प्राप्त ई-मेल संदेश.

(४) दि केरोसीन (रेस्ट्रीक्शन ऑन यूज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्राईस) ऑर्डर, १९९३.

अधिसूचना

क्रमांक निशि/केरो/२०१९/का.वि. ५०३/सहा/जा. ३५७.— शासनाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांच्याकडून सुधारित डेपो दर प्राप्त करून घेऊन त्याआधारे केरोसीनचे दर सुधारित करण्याची कार्यवाही करावी, असे आदेशित केले आहे ;

ज्याअर्थी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील एक्स-डेपो दरामध्ये दिनांक १ सप्टेंबर २०१९ पासून सुधारणा केलेली असल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई यांनी या कार्यालयास संदर्भ क्र. ३ च्या ई-मेल संदेशाद्वारे कळविले आहे.

त्याअनुषंगाने सुधारित एक्स डेपो दराचा तक्ता सोबत पाठवून सदर सुधारित एक्स डेपो दराच्या अनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या केरोसीनचा सुधारित कमिशनसह घाऊक व किरकोळ विक्री दर निश्चित करून त्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, वाचा क्र. ४ मध्ये नमूद आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार उप नियंत्रक, शिधावाटप (अंमल), मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर), केरोसीनच्या घरगुती वापराचे घाऊक व किरकोळ विक्रीचे दर दिनांक १ सप्टेंबर २०१९ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ अंमलात आणणेकरिता पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

अ. क्र.	बाब	सध्याचा दर (रुपये प्रति कि. लि.)	सुधारित दर (रुपये प्रति कि. लि.)
(१)	(२)	(३)	(४)
ए	एक्स डेपो दर (रुपये प्रति कि. लि.)	२९०५२.००	२९३०२.००
बी	वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) @ ५%	१४५२.६०	१४६५.१०
सी	घाऊक विक्रेत्यांसाठी एकूण खरेदी किंमत [ए+बी]	३०५०४.६०	३०७६७.१०
डी	(*i*) घाऊक विक्रेत्याचे कमिशन	१३४१.८८	१३४१.८८
	(*ii*) तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी असाधारण भत्ता.	९९.००	९९.००
	(*iii*) (A) वाहतूक खर्च	२८०.७९	२८०.७९
	(B) डिझेल व्यतिरिक्त अनुषंगिक बाबींचा खर्च	७०.२०	७०.२०
	(C) डिझेलवरील खर्चात झालेली वाढ	५४.८२	५४.८२
	एकूण वाहतूक खर्च (A+B+C)	४०५.८१	४०५.८१
	(*iv*) पथ कर (Toll Tax)	७०.००	७०.००
	(*v*) घाऊक वितरकांना पूर्णांकाचा लाभ	३.९३	१.५५
	(*vi*) एकूण किंमतवाढ : [डी (*i*) + डी (*ii*) + डी (*iii*) + डी (*iv*) + डी (*v*)]	१९२०.६२	१९१८.२४
इ	एकूण किंमत वाढीवर वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) @ ५% [डी (*vi*) च्या ५%].	९६.०३	९५.९१
एफ	एकूण–[सी + डी (*vi*) + इ] घाऊक विक्रीचा दर	३२५२१.२५	३२७८१.२५
एफ-१	किरकोळ विक्रेत्यांसाठी खरेदी किंमत	३२५२१.२५** (किंमत रुपये ३०९७२.६२+ वस्तू व सेवा कर रुपये १५४८.६३)	३२७८१.२५** (किंमत रुपये ३१२२०.२४+ वस्तू व सेवा कर रुपये १५६१.०१)
जी	किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह)	६७५.००	६७५.००
एच	किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह) वर टक्के वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) (जी च्या ५ टक्के).	३३.७५	३३.७५
आय	किरकोळ विक्री दर (रुपये प्रति किलो लिटर)	३३२३०.००** (किंमत रुपये ३१६४७.६२+ वस्तू व सेवा कर रुपये १५८२.३८).	३३४९०.००** (किंमत रुपये ३१८९५.२४+ वस्तू व सेवा कर रुपये १५९४.७६).
जे	किरकोळ विक्री दर (रुपये प्रति लिटर)	३३.२३	३३.४९

शासन परिपत्रक क्र. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक केईआर. १३७६/३७६९/सतरा, दिनांक १७ डिसेंबर १९७६ नुसार पूर्णांकाचा लाभ एकाच पातळीवर (घाऊक वितरक) घाऊक दरामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

(मा. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांच्या मान्यतेने)

लिलाधर दुफारे,
उप नियंत्रक, शिधावाटप (अंमल), चर्चगेट, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.